25 FEB 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवसंशोधनासाठी सर्वतोपरी मदत करणार

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांचे शिवाजी विद्यापीठ प्रशासनाला आश्वासन

- **सर्वांगीण विद्यार्थी विकास आणि संगणक सुविधा केंद्राच्या इमारतीचे पालकमंत्र्यांच्या हस्ते भूमीपूजन**



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सर्वांगीण विद्यार्थी विकास आणि संगणक सुविधा केंद्राच्या इमारतीचे भूमीपूजन करताना पालकमंत्री प्रकाश आबिटकर. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. शिंदे, डॉ. महाजन, डॉ. अजितसिंह जाधव आदी.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा मी विद्यार्थी असल्याने मला विद्यापीठाविषयी भरपूर आत्मियता आहे. विद्यापीठात सृजनात्मक आणि नवसंशोधनाच्या कामासाठी मी सर्वतोपरी मदत करेन, असे आश्वासन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी शिवाजी विद्यापीठ प्रशासनाला दिले.

शिवाजी विद्यापीठातील सर्वांगीण विद्यार्थी विकास आणि संगणक सुविधा केंद्राच्या इमारतीचे भूमीपूजन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पालकमंत्री आबिटकर बोलत होते. भूमीपूजनानंतर या इमारतीमध्ये कोणते विभाग होणार, नियोजन काय यासंदर्भातील माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. पालकमंत्री आबिटकर यांनी विद्यापीठ प्रशासनाला शुभेच्छा दिल्या.

शिवाजी विद्यापीठातील इमारतीच्या भूमीपूजनानंतर पालकमंत्री आबिटकर यांचे कुलगुरू कार्यालयात कुलगुरू डॉ. शिर्के यांनी स्वागत केले. त्यानंतर पालकमंत्री आबिटकर यांनी शैक्षणिक प्रगतीसह कार्यालयीन कामकाजाच्या कामाचा आढावा घेतला. पालकमंत्री आबिटकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठात सृजनात्मक कार्यासह आणि संशोधनाला चालना दिली जाते. या विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी माझ्याकडून जेवढी मदत करता येईल, तेवढी मदत करणार. तसेच नवसंशोधनासाठी सर्वतोपरी मदत करेन. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त नवसंशोधनावर भर द्यावा, असे आबिटकर यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सागर डेळेकर, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. शिवाजी जाधव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 FEB 2025
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सर्वांगीण विद्यार्थी विकास इमारतीचे भूमिपूजन करताना पालकमंत्री प्रकाश आबिटकर. समवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# शिवाजी विद्यापीठाने सृजनात्मक, नवोन्मेषी स्वरूपाचे काम करावे

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर; विद्यापीठात सर्वांगीण विद्यार्थी विकास इमारतीचे भूमिपूजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठास शासन स्तरावर सहकार्याची भूमिका राहील. विद्यापीठाने सृजनात्मक व नवोन्मेषी स्वरूपाचे काम येथून पुढील काळात अधिक गतीने करावे, अशी अपेक्षा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठात सोमवारी पालकमंत्री आबिटकर यांच्या हस्ते सर्वांगीण विद्यार्थी विकास आणि संगणक सुविधा केंद्राच्या इमारतींचे भूमिपूजन करण्यात आले. त्याचप्रमाणे इमारतीच्या कोनशिलेचे अनावरणही त्यांच्या हस्ते झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मंत्री आबिटकर यांना प्रकल्पाच्या आराखड्याविषयी माहिती दिली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेस केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर प्रमुख उपस्थित होते.

समारंभानंतर व्यवस्थापन परिषद सभागृहात कुलगुरू डॉ. शिर्के यांनी मंत्री आबिटकर यांच्यासमोर विद्यापीठाच्या वाटचालीविषयी सादरीकरण केले. ते म्हणाले, मी स्वतः शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी असल्यामुळे विद्यापीठाने केलेल्या वाटचालीचा मला अभिमान आहे. आपण सर्वांनी मिळून या विद्यापीठाचे भवितव्य अधिक उज्ज्वल होण्यासाठी प्रयत्न करू या.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. रामचंद्र पवार, उपकुलसचिव रणजित यादव, अमित कांबळे, विजय पोवार, वैभव आरडेकर आदी उपस्थित होते.

25 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे भवितव्य उज्ज्वल होण्यासाठी प्रयत्न

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर; सर्वांगीण विद्यार्थी विकास इमारतीचे भूमिपूजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मी शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी असल्यामुळे विद्यापीठाने केलेल्या वाटचालीचा मला अभिमान आहे. आपण सर्व जण मिळून या विद्यापीठाचे भवितव्य अधिक उज्ज्वल होण्यासाठी प्रयत्न करूया, असे आवाहन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. सोमवारी त्यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठातील सर्वांगीण विद्यार्थी विकास आणि संगणक सुविधा केंद्राच्या इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले. भूमिपूजन



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सर्वांगीण विद्यार्थी विकास इमारतीच्या भूमिपूजनप्रसंगी कोनशिला अनावरण करताना पालकमंत्री प्रकाश आबिटकर.**

समारंभानंतर व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

पालकमंत्री आबिटकर म्हणाले, विद्यापीठाच्या विकासासाठी शासन स्तरावरही सर्वतोपरी सहकार्य करण्याची भूमिका राहील. विद्यापीठाने सृजनात्मक आणि नवोन्मेषी स्वरूपाचे काम येथून पुढील काळात अधिक गतीने करावे.

शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय व सबस्टेशन क्र. १ जवळील परिसरात शिवाजी विद्यापीठाने सर्वांगीण विद्यार्थी विकास आणि संगणक सुविधा केंद्र उभारण्याचे ठरवले आहे. प्रस्तावित इमारतीमध्ये केंद्रीय रोजगार कक्ष, कौशल्य विकास कक्ष, संशोधन व विकास कक्ष, संस्थात्मक नवोन्मेष मंडळ, सेमिनार कक्ष, परिषद सभागृह, एसयूके संशोधन व विकास फाऊंडेशन, आंतरराष्ट्रीय व्यवहार कक्ष, नवोन्मेष क्लिनिक, प्रयोगशाळा प्रशासक इत्यादी कक्षांचा समावेश असणार आहे.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी मंत्री आबिटकर यांना प्रकल्पाच्या आराखड्याविषयी माहिती दिली. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेस केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी या इमारतीमधील माहिती दिली.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पवार, उपकुलसचिव रणजित यादव, अमित कांबळे, विजय पोवार, वैभव आरडेकर आदी उपस्थित होते.

25 FEB 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत
मस्ट READ

# विद्यापीठात सृजनात्मक काम गतीने व्हावीत : आबिटकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने सृजनात्मक आणि नवोन्मेषी स्वरूपाचे काम येथून पुढील काळात अधिक गतीने करावे, अशी अपेक्षा राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सोमवारी व्यक्त केली. येथील सर्वांगीण विद्यार्थी विकास आणि संगणक सुविधा केंद्राच्या इमारतीचे भूमिपूजन मंत्री आबिटकर यांच्या हस्ते झाले. भूमिपूजन समारंभानंतर व्यवस्थापन परिषद सभागृहात आयोजित बैठकीत त्यांनी संवाद साधला.

मंत्री आबिटकर म्हणाले, मी स्वतः विद्यापीठाचा विद्यार्थी असल्यामुळे या वाटचालीचा मला अभिमान आहे. आपण सर्वांनी मिळून या विद्यापीठाचे भवितव्य उज्ज्वल होण्यासाठी प्रयत्न करूया. त्यासाठी शासन स्तरावरही सर्वतोपरी सहकार्य करण्याची भूमिका राहील. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी प्रकल्पाच्या आराखड्याविषयी माहिती दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे डॉ. सागर डेळेकर, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात सर्वांगीण विद्यार्थी विकास इमारतीच्या कोनशिलेचे अनावरण पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

## कशी असेल इमारत

इमारतीच्या कामासाठी केंद्र सरकारच्या पीएम-उषा या योजनेअंतर्गत निधी मंजूर झाला असून, या इमारतीचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ठेव अंशदान योजनेअंतर्गत करण्यात येणार आहे. इमारतीसाठी साडेपाच कोटी रुपये खर्च प्रस्तावित आहे. सध्या तळमजला अधिक पहिला मजला असे बांधकाम प्रस्तावित असून, त्यांचे क्षेत्रफळ अनुक्रमे ९४९.४९ चौरस मीटर आणि ९१०.६१ चौरस मीटर, असे एकूण १८६०.१० चौरस मीटर असेल.

25 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'विद्यार्थी विकास'ची अद्ययावत इमारत साकारणार

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते भूमिपूजन; बारा कक्ष एकाच ठिकाणी येणार

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठात साकारणाऱ्या सर्वांगीण विद्यार्थी विकास आणि संगणक सुविधा केंद्राच्या अद्ययावत इमारतीचे भूमिपूजन आज पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठ मुद्रणालयाजवळील या प्रस्तावित इमारतीमध्ये केंद्रीय रोजगार, कौशल्य विकास, संशोधन व विकास, सेमिनार, आंतरराष्ट्रीय व्यवहार, संस्थात्मक नवोन्मेष मंडळ, परिषद सभागृह, एसयूके संशोधन व विकास फाउंडेशन, नवोन्मेष क्लिनिक, प्रयोगशाळा प्रशासक आदी बारा कक्षांचा समावेश असणार आहे.

या इमारतीच्या आराखड्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पालकमंत्री आबिटकर यांना दिली.



शिवाजी विद्यापीठात सोमवारी सर्वांगीण विद्यार्थी विकास केंद्राच्या इमारतीच्या भूमिपूजनप्रसंगी कोनशिला अनावरण पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इनोव्हेशन सेंटरचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी या इमारतीमधील विविध कक्षांची वैशिष्ट्ये सांगितली. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, धनंजय सुतार, रामचंद्र पवार, रणजित यादव, अमित कांबळे, विजय पोवार, वैभव आरडेकर, रमेश पोवार, आदी उपस्थित होते.

दरम्यान, या इमारतीच्या कामासाठी केंद्र सरकारच्या पीएम-उषा या योजनेंतर्गत निधी मंजूर झाला आहे. या इमारतीचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे ठेव अंशदान योजनेंतर्गत करण्यात येणार आहे. सुमारे साडेपाच कोटी रुपये खर्च प्रस्तावित आहे. सध्या तळमजला अधिक पहिला मजला, असे बांधकाम प्रस्तावित असून, ते वर्षभरात पूर्ण केले जाईल. या इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १८६०.१० चौरस मीटर आहे.

### विद्यापीठात सृजनात्मक कार्य व्हावे

व्यवस्थापन परिषद सभागृहात कुलगुरू डॉ. शिर्के यांनी पालकमंत्री आबिटकर यांच्यासमोर विद्यापीठाच्या वाटचालीविषयी सादरीकरण केले. त्यावर पालकमंत्री आबिटकर म्हणाले, 'मी स्वतः शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी असल्यामुळे विद्यापीठाने केलेल्या वाटचालीचा मला अभिमान आहे. आपण सर्वांनी मिळून या विद्यापीठाचे भवितव्य अधिक उज्ज्वल होण्यासाठी प्रयत्न करूया. त्यासाठी शासनस्तरावरही सर्वोतोपरी सहकार्य करण्याची भूमिका राहील. विद्यापीठाने सृजनात्मक आणि नवोन्मेषी स्वरूपाचे काम येथून पुढील काळात अधिक गतीने करावे.'

25 FEB 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशभरातील लोकवाद्यांनी निनादले शिवाजी विद्यापीठ !

## वाद्यमहोत्सवाला विद्यार्थी, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; कुलगुरूंच्या हस्ते उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागातर्फे सुरू असलेल्या तीनदिवसीय 'शिवस्पंदन महोत्सवा'त सोमवारी वाद्य महोत्सवामुळे विद्यापीठ परिसर विविध लोकवाद्यांच्या सूरतालांनी निनादला. ज्या वाद्यांचा आवाज व संगीत केवळ ध्वनिफिती अथवा चित्रपटांमधूनच कानी पडतात, अशा वाद्यांना प्रत्यक्ष पाहण्याची, ऐकण्याची संधी नागरिकांना लाभली. लोकवाद्य वादन कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवत त्याचा आनंद लुटला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात वाद्यमहोत्सवाचे हलगी वाजवून उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. समवेत डॉ. नितीन कांबळे, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. विनोद ठाकूर-देसाई (छाया : पप्पू अत्तार)

विद्यापीठात सोमवारी सकाळी लोकवाद्य वादन महोत्सव झाला. उपक्रमांतर्गत देशाच्या चार दिशांकडील राज्यांतील वाद्ये विद्यापीठ परिसराच्या चार दिशांना वाजविण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील परिसरात सकाळी साडेसात वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी हलगी वाजवून उपक्रमाचे उद्घाटन केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यासमोरील परिसर, संगीत व नाट्यशास्त्र विभागाशेजारील तलाव व क्रांतिवन या ठिकाणी विविध वाद्यांचे वादन करण्यात आले. सर्व मान्यवरांनी संयोजन समितीच्या सदस्यांसह सदर सादरीकरणांचा आस्वाद घेत वादक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. या सर्व लोकवाद्यांचे सायंकाळी राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात प्रदर्शन मांडण्यात आले. त्यामध्ये प्रत्येक वाद्याची माहिती देण्यात आली.

ऋषीकेश देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली नितीन शिंदे, कौस्तुभ शिंदे, अभय हावळ, अनिकेत देशपांडे, प्रेम भोसले, ओम शिंदे, सुमंत कुलकर्णी, मयुरेश शिखरे, तेजस गोविलकर, सौरभ आदमाने यांनी वाद्यांचे सादरीकरण केले. तत्पूर्वी, सकाळच्या सत्रात प्राणीशास्त्र अधिविभाग सभागृहात शिवस्पंदन महोत्सवातील मूकनाट्य, नकला आणि लघुनाटिका स्पर्धा झाल्या. त्यानंतर दुपारच्या सत्रात शिक्षक, प्रशासकीय सेवक यांचा सांस्कृतिक कार्यक्रम राजर्षी शाहू सभागृहात रंगला. यावेळी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले, समन्वयक डॉ. नितीन कांबळे, डॉ. मीना पोतदार, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, डॉ. के. डी. कुचे, डॉ. एस. टी. कोंबडे उपस्थित होते.

### लोकवाद्यांचे झाले वादन

शिवस्पंदन महोत्सवात ढोलकी, ढोल, दिमडी, चौंडके, हलगी, संबळ, घुमके, थविल, चेंडा, इडक्का, कोट्ठू, मुरासू, थमारू, पंबई ईसाई, ऊरूमी, उडुक्काई, मोडा, पराई, पंजाबी ढोल, चिमटा, टोका, कैची, दह, बुगचू, तुंबी, ढोलक, भपंग, खोळ, मोंडल, एकतारी, खमख, बिहू ढोल, तिबेटियन गाँग, बडुंगदुप्पा, पेपा, गोंगना ही देशाच्या विविध प्रांतात वाजविली जाणारी वाद्ये वाजविण्यात आली.

### शिवस्पंदन महोत्सवात आज एकल नृत्य, समूह नृत्य स्पर्धा

शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवाचा मंगळवारी (दि. २५) अखेरचा दिवस असून, राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात एकल नृत्य, समूह नृत्य स्पर्धा होतील. त्यानंतर दुपारी ४ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वितरण समारंभ होणार आहे.

25 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशभरातल्या लोकवाद्यांचा शिवाजी विद्यापीठात निनाद

## वाद्य महोत्सवाला विद्यार्थी, नागरिकांचा प्रतिसाद

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागातर्फे सुरू असलेल्या तीन दिवसीय शिवस्पंदन महोत्सवात सोमवारी दुसऱ्या दिवशी आयोजित वाद्य महोत्सवामुळे विद्यापीठ परिसर विविध लोकवाद्यांच्या सूरतालांनी निनादला. ज्या वाद्यांचा आवाज आणि संगीत केवळ ध्वनिफिती अथवा चित्रपटांमधूनच कानी पडते, अशा वाद्यांना प्रत्यक्ष पाहण्याची आणि ऐकण्याची संधी यामुळे नागरिकांना लाभली. या लोकवाद्य वादन कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवली आणि त्याचा आनंद लुटला.



कोल्हापूर : वाद्य महोत्सवाचे हलगी वाजवून उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत मान्यवर.

गतवर्षी भारताच्या स्वातंत्र्यास ७५ वर्षे पूर्ण होत असताना देशभरातील लोकवाद्यांचे वादन आणि प्रदर्शन शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्याचा कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांचा मानस होता. त्यांच्याच संकल्पनेतून गतवर्षीपासून या लोकवाद्य महोत्सव व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील परिसरात सकाळी साडेसात वाजता कुलगुरू डॉ. शिर्के यांनी हलगी वाजवून या उपक्रमाचे सांगीतिक उद्घाटन केले. या सर्व लोकवाद्यांचे सायंकाळी राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात प्रदर्शनही मांडण्यात आले. त्यामध्ये प्रत्येक वाद्याची माहिती देण्यात आली. ऋषीकेश देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली नितीन शिंदे, कौस्तुभ शिंदे, अभय हावळ, अनिकेत देशपांडे, प्रेम भोसले, ओम शिंदे, सुमंत कुलकर्णी, मयुरेश शिखरे, तेजस गोविलकर, सौरभ आदमाने यांनी या विविध वाद्यांचे सादरीकरण केले. संयोजन समितीच्या सर्व सदस्यांनी उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

यावेळी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले, समन्वयक डॉ. नितीन कांबळे, डॉ. मीना पोतदार, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, डॉ. के. डी. कुचे, डॉ. एस. टी. कोंबडे आदी उपस्थित होते.

### विविध प्रांतांतील वाद्यांचा सूर-ताल

शिवाजी विद्यापीठात आयोजित लोकवाद्य वादन व प्रदर्शनात पुढील वाद्यांचा समावेश राहिला. ढोलकी, ढोल, दिमडी, चौंडके, हलगी, संबळ, घुमके, थविल, चेंडा, इडक्का, कोट्टू, मुरासु, थमारू, पंबई ईसाई, उरुमी, उड्डक्काई, मोडा, पराई, पंजाबी ढोल, चिमटा, टोका, कैची, दद्द, बुगचू, तुंबी, ढोलक, भपंग, खोळ, मॉडल, एकतारी, खमख, बिहू ढोल, तिबेटियन गॉग, बडुंगदुप्पा, पेपा, गोगना ही देशाच्या विविध प्रांतांत वाजवली जाणारी वाद्ये वाजवण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 FEB 2025
लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या वाद्यमहोत्सवाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी हलगी वाजवून उद्घाटन केले. यावेळी डॉ. नितीन कांबळे, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. विनोद ठाकूर-देसाई उपस्थित होते.

# देशभरातल्या लोकवाद्यांनी निनादला विद्यापीठ आवार

## वाद्यमहोत्सवाला प्रतिसाद : शिवस्पंदन महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने सुरू असलेल्या तीनदिवसीय शिवस्पंदन महोत्सवात सोमवारी आयोजित वाद्य महोत्सवामुळे विद्यापीठ परिसर विविध लोकवाद्यांच्या सूरतालांनी निनादला. ज्या वाद्यांचा आवाज आणि संगीत केवळ ध्वनिफिती अथवा चित्रपटांमधूनच कानी पडतात, अशा वाद्यांना प्रत्यक्ष पाहण्याची आणि ऐकण्याची संधी यामुळे लाभली. या उपक्रमाअंतर्गत देशाच्या चार दिशांकडील राज्यांतील वाद्ये विद्यापीठाच्या चार दिशांना वाजविली.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील परिसरात सकाळी साडेसात वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी हलगी वाजवून या उपक्रमाचे उद्घाटन केले. ऋषिकेश देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली नितीन शिंदे, कौस्तुभ शिंदे, अभय हावळ, अनिकेत देशपांडे, प्रेम भोसले, ओम शिंदे, सुमंत कुलकर्णी, मयुरेश शिखरे, तेजस गोविलकर, सौरभ आदमाने यांनी वाद्यांचे सादरीकरण केले.

## या लोकवाद्यांचे झाले वादन

लोकवाद्य वादन व प्रदर्शनात ढोलकी, ढोल, दिमडी, चौंडके, हलगी, संबळ, घुमके, थविल, चेंडा, इडक्का, कोट्टू, मुरासू, थमारू, पंबई ईसाई, उरुमी, उडुक्काई, मोडा, पराई, पंजाबी ढोल, चिमटा, टोका, कैची, दद्द, बुगचू, तुंबी, ढोलक, भपंग, खोळ, मोंडल, एकतारी, खमख, बिहू ढोल, तिबेटियन गाँग, बडुंगदुप्पा, पेपा, गोंगना ही देशाच्या विविध भागात वाजविली जाणारी वाद्ये वाजविण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 FEB 2025
सकाळ



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सोमवारी सकाळी वाद्य महोत्सव रंगला.

# देशभरातल्या लोकवाद्यांनी निनादला विद्यापीठ परिसर

## वाद्यमहोत्सवाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागाच्या शिवस्पंदन महोत्सवात आज सकाळी साडेसात ते साडेनऊ या कालावधीत आयोजित केलेल्या वाद्य महोत्सवामुळे विद्यापीठ परिसर विविध लोकवाद्यांच्या सूरतालांनी निनादला. या लोकवाद्य वादन कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शविली आणि त्याचा आनंद लुटला.

या उपक्रमांतर्गत देशाच्या चार दिशांकडील राज्यांतील वाद्ये विद्यापीठ परिसराच्या चार दिशांना वाजविण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील परिसरात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी हलगी वाजवून या उपक्रमाचे सांगीतिक उद्घाटन केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यासमोरील परिसर, संगीत व नाट्यशास्त्र विभागाशेजारील तलाव आणि क्रांतीवन या ठिकाणीही विविध वाद्यांचे वादन करण्यात आले. या

> “भारतीय संगीत परंपरेचा आपल्या विद्यार्थी व नागरिकांना परिचय व संवर्धन करण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. लोकांचाही त्याला उत्तम प्रतिसाद लाभतो आहे.”
>
> **-डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू**

सर्व लोकवाद्यांचे सायंकाळी राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात प्रदर्शनही मांडण्यात आले. ऋषीकेश देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली नितीन शिंदे, कौस्तुभ शिंदे, अभय हावळ, अनिकेत देशपांडे, प्रेम भोसले, ओम शिंदे, सुमंत कुलकर्णी, मयूरेश शिखरे, तेजस गोविलकर, सौरभ आदमाने यांनी या विविध वाद्यांचे सादरीकरण केले. तत्पूर्वी सकाळच्या सत्रात प्राणीशास्त्र अधिविभाग सभागृहात मूकनाट्य, नकला आणि लघुनाटिका स्पर्धा पार पडल्या. दुपारच्या सत्रात शिक्षक, प्रशासकीय सेवक यांचाही सांस्कृतिक कार्यक्रम राजर्षी शाहू सभागृहात रंगला.

25 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वत विकासाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

विज्ञानाच्या बळावर जागतिक प्रगतीची स्वप्ने पाहात असताना शाश्वत विकासाला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय विज्ञान दिन सप्ताहाला प्रारंभ झाला. याचा उद्घाटन समारंभ रसायनशास्त्र अधिविभाग सभागृहात झाला. यावेळी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे वैज्ञानिक डॉ. अशोक गिरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, जागतिक स्तरावर शैक्षणिक संस्थांनी नाविन्यपूर्ण संशोधनाबरोबरच त्याचे उपयोजन आणि त्यावरील स्वामित्वहक्क या अनुषंगाने पावले उचलली आहेत. स्टॅनफोर्ड विद्यापीठाने आजपर्यंत दोन हजारांहून अधिक कंपन्या स्थापन केल्या आहेत. आपल्याला सुद्धा आता काळाची पावले ओळखून हा मार्ग चोखाळावा लागणार आहे. शैक्षणिक संस्था आणि विद्यापीठे यांनी आता कंपन्या स्थापन करण्यास प्राधान्य द्यायला हवे. या माध्यमातून वैज्ञानिक प्रगती साधत असतानाच शाश्वत, पर्यावरणपूरक विकासाची कास मात्र सोडता कामा नये, असेही त्यांनी सांगितले. डॉ. अशोक गिरी यांनी जागतिक स्तरावर प्रतिष्ठेची मानली जाणारी हम्बोल्ट फेलोशीप मिळविण्यासाठी कशा प्रकारे संशोधनाची दिशा राखली पाहिजे, या दृष्टीने शिवाजी विद्यापीठातील संशोधकांना मोफत मार्गदर्शन करण्याचा मनोदय व्यक्त केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या उद्घाटन समारंभात डॉ. अशोक गिरी यांचे स्वागत करताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. कैलास सोनवणे, डॉ. के. एम. गरडकर.

रसायनशास्त्र अधिविभाग प्रमख डॉ. कैलास सोनवणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. क्रांती मोरे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. डी. एच. दगडे, डॉ. पोरे, डॉ. गजानन राशिनकर, डॉ. तायडे, डॉ. संदीप संकपाळ, डॉ. राहुल माने आदी उपस्थित आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 FEB 2025

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या उद्‌घाटन समारंभात डॉ. अशोक गिरी यांचे स्वागत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. यावेळी डॉ. कैलास सोनवणे, के. एम. गरडकर उपस्थित होते.

# शाश्वत विकासाला सर्वोच्च प्राधान्य द्या : डॉ. पाटील

## विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञानदिन सप्ताहाला प्रारंभ

कोल्हापूर, ता. २४ : 'विज्ञानाच्या बळावर जागतिक प्रगतीची स्वप्ने पाहत असताना शाश्वत विकासाला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे. जागतिक स्तरावर शैक्षणिक संस्थांनी नावीन्यपूर्ण संशोधनासह त्याचे उपयोजन, त्यावरील स्वामित्व हक्क या अनुषंगाने पावले उचलली आहेत. वैज्ञानिक प्रगती साधताना शाश्वत, पर्यावरणपूरक विकासाची कास मात्र सोडता कामा नये,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी आज येथे केले.

विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभाग सभागृहात आयोजित राष्ट्रीय विज्ञान दिन सप्ताहाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे वैज्ञानिक डॉ. अशोक गिरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. गिरी यांनी जागतिक स्तरावर प्रतिष्ठेची मानली जाणारी हम्बोल्ट फेलोशीप मिळविण्यासाठी कशा प्रकारे संशोधनाची दिशा राखली पाहिजे, यादृष्टीने शिवाजी विद्यापीठातील संशोधकांना मोफत मार्गदर्शन करण्याचा मनोदय व्यक्त केला.

रसायनशास्त्र अधिविभागप्रमख डॉ. कैलास सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. सप्ताह संयोजन डॉ. डी. एच. दगडे, गजानन राशिनकर, संदीप संकपाळ, राहुल माने आदींनी केले आहे. डॉ. क्रांती मोरे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 FEB 2025
पुढारी

# 'नॅनो मटेरियल्स' विज्ञान-तंत्रज्ञानातील क्रांतिकारी पाऊल : डॉ. राजपुरे

## न्यू कॉलेजच्या पदार्थ विज्ञान विभागातर्फे कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नॅनो टेक्नॉलॉजीतील प्रगतीने 'नॅनो मटेरियल्स' विविध उद्योगांत क्रांती घडवित आहे. आरोग्य सेवा, इलेक्ट्रॉनिक्स, ऊर्जा व पर्यावरण आदींसारख्या नॅनो मटेरियल्सच्या नव्या संशोधनामुळे कार्यक्षम किफायतशीर उपाय शोधले जात आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. के. वाय. राजपुरे यांनी केले.

न्यू कॉलेजच्या पदार्थ विज्ञान विभागातर्फे आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील होते. यावेळी डॉ. मुर्तझा बोहरा, डॉ. विकास पाटील, डॉ. पद्मनाभ राव, डॉ. विजय हिरवारकर, डॉ. अपूर्व शर्मा यांच्यासह उपप्राचार्य डॉ. आर. डी. ढमाले, एम. वाय. कांबळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 FEB 2025

तरुण भारत

# विद्यापीठात गुंजला वाद्यांचा निनाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी पुतळा, संगीत व नाट्यशास्त्र विभागाशेजारील तळे, क्रांतीवन आदी ठिकाणी देशभरातील वाद्य वादन झाले. त्यामुळे विद्यापीठ परिसरात वाद्यांचा आवाज गुंजत होता. हलगी, संबळ, घुमके, थविल, चेंडा, इडक्का, कोट्टू, मुरासू थमारू, पंबई ईसाई, उरुमी, उडुक्काई, मोडा, पराई, पंजाबी ढोल, चिमटा, टोका, कैची, दद्द, बुगचू, तुंबी, ढोलक, भपंग आदी वाद्य वाजविण्यात आली. विद्यापीठात येणारी प्रत्येक व्यक्ती वाद्यांच्या सूरांनी प्रसन्न झाली.

शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने शिवस्पंदन महोत्सवाचे आयोजन केले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी हलगी वाजवून संगीताचे उद्घाटन केले. लोकवाद्यांचे सायंकाळी राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात प्रदर्शनही मांडण्यात आले. त्यामध्ये प्रत्येक वाद्याची माहिती देण्यात आली. ऋषीकेश देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली नितीन शिंदे, कौस्तुभ शिंदे, अभय हावळ, अनिकेत देशपांडे, प्रेम भोसले, ओम शिंदे, सुमंत कुलकर्णी, मयुरेश शिखरे, तेजस गोविलकर, सौरभ आदमाने यांनी या विविध वाद्यांचे सादरीकरण केले.

प्राणीशास्त्र अधिविभाग सभागृहात शिवस्पंदन महोत्सवातील मूकनाट्य, नकला आणि लघुनाटिका स्पर्धा पार पडल्या. त्यानंतर दुपारच्या सत्रात शिक्षक, प्रशासकीय सेवक यांचाही सांस्कृतिक कार्यक्रम राजर्षी शाहू सभागृहात रंगला. यावेळी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले, समन्वयक डॉ. नितीन कांबळे, डॉ. मीना पोतदार, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, डॉ. के.डी. कुंचे, डॉ. एस.टी. कोंबडे उपस्थित होते.